दै. पुण्यनगरी दि. 11.12.2025

# वाळू उपसा करणारे २.२० कोटींचे साहित्य नष्ट

## उस्माननगर पोलिस व महसूल पथकाची कारवाई



**कापसी / प्रतिनिधी**

उस्माननगर पोलिस ठाणे व महसूल पथकाने या भागातील गोदावरील नदीपात्रातून वाळू उपसा करणाऱ्यांविरुध्द मोहीम राबवित २.२० कोटींचे साहित्य नष्ट केले आहे.

दि.१० डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर, उस्माननगर पोलिस ठाण्याचे सपोनि संजय नीलपत्रेवार यांच्या संयुक्त पथकाने येळी - महाटी पुलालगत वाळू उपसा करणारी बोट आढळून आली. सदर फायबर महाटीच्या बाजूस असलेल्या सीता नदीमध्ये पळून जात असताना वरील पथकाने बोटच्या सहाय्याने सदर बोटचा पाठलाग केला. सदर बोट पुढे असलेल्या ६ बोटीजवळ जाऊन थांबली. त्याठिकाणी एकूण मोठया ७ बोटी प्रत्येकी २५ लक्ष रुपयांचा आहेत. एकूण पावणे दोन कोटी, लहान बोटी, इंजिन असा एकूण ४५ लाखांचे साहित्य जप्त करण्यात आले. एकूण २.२० कोटींचे वाळू उपसा साहित्य जप्त करुन ते तहसीलदार विठ्ठल परळीकर, मुदखेडच्या तहसीलदार पथकातील कामठेकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय नीलपत्रेवार, मुदखेडचे पोलिस निरीक्षक शिंदे यांनी माळकौठा शिवारात पंचासमक्ष नष्ट केले. या कारवाईत मंडळ अधिकारी रेनके, सूगावे, पवार, ठाकूर, ग्राम महसूल अधिकारी पवार, रायाजी, पांडागळे , मुंढे, भांगे, नरवाडे,जाधव, एकाडे, गोधने, लाडेकर, मेहूनकर, गाढे,बोधगिरे, महसूल सेवक विठ्ठल ढेपे यांनी सहभाग घेतला.